# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.७० दिनांक १७/०७/२०२१

## जबरीने सोनसाखळी चोरणा-या अट्टल गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली शिताफीने अटक,एकुण २ चैन स्नॅचिगचे गुन्हे उघडकीस.

I] दि.२८/६/२०२१ रोजी सकाळी ०९.४० वा.चे सुमारास फिर्यादी सौ.गौरी शिवदयाल पटनाईक वय ६१ रा.गोकुळधाम पालघर या पालघर - माहीम रोडवरील विजया बॅंकच्या समोरुन बाजूने पायी जात असताना ठिकाणी पाठीमागून युनीकार्न मोटार सायकल वरुन आलेल्या दोन अनोळखी आरोपीपैकी पाठीमागे बसलेल्या आरोपीने फिर्यादी यांचे गळयातील १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जबरीने चोरुन नेले. तदनंतर नमुद अनोळखी आरोपी यांनी पालघर बोईसर रोडवरील विजया बॅंकेच्या समोरुन पायी जाणा-या श्रीमती वंदना बाळाजी तेरे रा.विदयानगर उमरोली यांचे गळयातील ३० गॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जबरी चोरी करुन नेले होते याबाबत पालघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.१४५/२०२१ भादंविसक.३९२,३४ प्रमाणे दोन अनोळखी आरोपी विरुध्द दि.२८/०६/२०२१ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवून मा.श्री दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक,पालघर , मा.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक,पालघर, व मा.श्री विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी,पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पालघर पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक ढाकरे, पोलीस उप निरीक्षक अल्पेश विशे,वाणगांव पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनीटचे आशिष पाटील यांची तपास पथके तयार केली. सदर तपास पथकांना वेळोवेळी सुचना व मार्गदर्शन करुन वेगवेगळया परीसरात रवाना करुन जबरीने सोनसाखळी चोरी करणा-या आरोपींची माहीती संकलीत केलेली होती. सदर गुन्हयात कोणत्याही प्रकारचे धागेदोरे नसताना कौशल्यपुर्ण गुन्हयाचा तपास करुन पोलीस उप निरीक्षक आशिष पाटील व पोउनि/अल्पेश विशे यांचे पथकाने आरोपी वय ४५ वर्षे रा.आंबीवली पाटीलनगर इराणी वस्ती जि.ठाणे यास ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचा साथीदार आरोपी वय ३६ वर्षे रा.आंबीवली पाटीलनगर इराणी वस्ती जि.ठाणे याचेसह केल्याचे कबूल केले आहे. त्याच्याकडून गुन्हयात चोरीस गेलेला मुददेमाल हस्तगत करुन आरोपीत क्र.१ याचा साथीदार आरोपी क्र. २ हा सध्या राजेंद्रनगर राज्य गुजरात येथील गुन्हयात अटक केलेला आहे. त्याचा ताबा घेण्याबाबत कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन त्यास देखील गुन्हयात तात्काळ अटक करुन अधिक तपास करीत आहोत.

II] दि.०८/०१/२०२१ रोजी सायंकाळी १८.१० वा.ते १८.२० वा.चे सुमारास फिर्यादी सौ.स्वाती राजाराम जमदाडे वय ३१ रा.मातोश्री बंगला आर्यन ग्राऊंड जवळ पालघर या रामनगर पोलीस कॉलनीचे कॉर्नर जवळून जात असताना एका काळे रंगाचे मोटार सायकल वरुन आलेल्या दोन अनोळखी आरोपीपैकी पाठीमागे बसलेल्या आरोपीने फिर्यादीचे गळयातील दोन लाख रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र जबरीने चोरून नेल्याने अनोळखी आरोपी विरुध्द पालघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ०५/२०२१ भा.द.वि.स.क.-३९२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

नमुद गुन्हयातील अटक आरोपी यांचेविरुध्द पालघर व ठाणे शहर जिल्हयातील विविध पोलीस ठाण्यात खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १ | पालघर पोलीस ठाणे | १४५/२०२१ भादविस कलम,३९२. ३४ प्रमाणे |
| २ | पालघर पोलीस ठाणे | ०५/२०२१ भा.द.वि.स.क.-३९२,३४ प्रमाणे |
| ३ | महात्मा फुले पोलीस ठाणे, ठाणे शहर | ११०८/२०१५ भादंविसक.३९२,३४ |
| ४ | महात्मा फुले पोलीस ठाणे, ठाणे शहर | १६५७/२०१५भादंविसक.३५३,३३२,३३३,१४१,१४२,१४३, १४६,२२५ (अ )प्रमाणे |
| ५ | विठठलवाडी पोलीस ठाणे,ठाणे शहर | १०४५/२०१५ भादंविसक.३९२,३४ |
| ६ | जे.जे.मार्ग पोलीस ठाणे,ठाणे शहर | १४०/२०१५ भादंविसक.१७०,४२०,३४ |
| ७ | खडकपाडा पोलीस ठाणे,ठाणे शहर | १४८/२०१९ भादंविसक.३५३,३३२,३३३, ५०४, ५०६(२),१४३ |
| ८ | कापुरबावडी पोलीस ठाणे,ठाणे शहर | १४८९/२०१२ भादंविसक.३९४,३४ |
| ९ | महात्मा फुले पोलीस ठाणे,ठाणे शहर | १४८९/२०१२ भादंविसक.३९४,३४ |
| १० | विठठलवाडी पोलीस ठाणे,ठाणे शहर | १०८/२०१५ भादंविसक.३९२,३४ |
| ११ | विठठलवाडी पोलीस ठाणे,ठाणे शहर | १२९/२०१५ भादंविसक.३९२,३४ |

नमुद गुन्हयातील आरोपीत यांचेविरुध्द जबरी चोरीचे ८ गुन्हे, सरकारी नोकरावर हल्ले ०२ गुन्हे, बतावणी करुन फसवणुक करणे १ गुन्हा असे एकुण ११ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री.दत्तात्रय शिंदे,पोलीस अधीक्षक पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्री.रविंद्र नाईक, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक अल्पेश विशे, पोलीस उप निरीक्षक, आशिष पाटील व बोईसर युनिटचे पोलीस कर्मचारी पोहवा.दिपक राऊत, पोहवा.हिरामण खोटरे, पोहवा.निरज शुक्ला, पोहवा.संदीप सुर्यवंशी, पोना.नरेंद्र पाटील, पोना.कैलास पाटील,पोना.कपिल नेमाडे, पोना.राकेश पाटील, पोना.विजय ठाकूर तसेच पोना.पालवे व पोना.वसावे नेमणुक पालघर पो.स्टे.व पोशि. प्रशांत निकम, पोशि.अहिरे, बोईसर पोलीस ठाणे यांनी केलेली आहे .